# फळशास्त्र विभाग
## उद्यानविद्या विद्याशाखा
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./ फळरोप वाटिका/ कलम/ ५८७/२०२३ दि. २३ /१०/२०२३

**<u>दर पत्रक सुचना</u>**

प्रती,

.......................................................
.......................................................
.......................................................

**विषय: संत्रा / मोसंबी कलमीकरण (डोळा कलम) बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने बांधणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून संत्रा व मोसंबी या फळपिकाची अभिवृद्धी (डोळा कलम) करावयाचे आहे. तरी कृपया ईच्छुक ठेकेदारांनी खालील प्रमाणे दरपत्रके या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ. क्र. | कामाचे विवरण | शेरा | सादर करावयाचा दर |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ३. |
| १ | संत्रा व मोसंबी कलम निर्मिती करिता डोळा कलम द्वारे अभिवृद्धी करणे.<br><br>(यामध्ये प्रथम कलम बांधणी नंतर पट्टी उघडणे, यशस्वी कलमांची छाटणी (topping) करणे, व उर्वरित/अयशस्वी कलम पुन्हा बांधणे व त्यांची topping करणे ई.) | कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) रक्कम प्रथम कलम बांधणी नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि द्वितीय कलम बांधणी व topping झाल्या नंतर एकूण संखेच्या आधारे अदा करण्यात येईल. | प्रती डोळा कलम (स्तंभ २ व ३ प्रमाणे) |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. ३०/१०/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. सर्व दर पत्रके हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांच्या नावे दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

1. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.
2. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'संत्रा / मोसंबी डोळा कलम बांधने बाबत'** असे नमूदकरावे तसेच दर पत्रका मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र. वि.प्र./ फळरोपवाटिका/ 587 /२०२३ व दि. 23 /१०/२०२३ नमूद करावा.
3. ठेकेदाराने या पूर्वी शासकीय अथवा निमशासकीय कार्यालया मध्ये सदरचे काम केले असल्यास त्या बाबत चे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
4. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.
5. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
6. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
7. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.
8. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतः स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.
9. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवस करिता अथवा ३१ मार्च २०२४ पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.
10. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.
11. प्रक्षेत्रावरील नेत्रकांड्या काढण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल.
12. दर पत्रक मंजूर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.
13. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.
14. या दर प्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.
15. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत दर पत्रकावर स्वतंत्रपणे अथवा वेगळे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला